128

## MAHARASHTRA ACT No. XIX OF 1982.

## THE MAHARASHTRA LUXURY-CUM-ENTERTAINMENT AND AMUSEMENT TAX ON HOLDERS OF TELEVISION SETS ACT, 1982

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राज्यपाल यांची संमती दिनांक १० मे १९८२ रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे, सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

एम. जी. मुजुमदार,
सह-सचिव, महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT No. XIX OF 1982.

## AN ACT TO LEVY AND COLLECT A LUXURY-CUM-ENTERTAINMENT AND AMUSEMENT TAX ON HOLDERS OF TELEVISION SETS IN MAHARASHTRA

[ राज्यपाल यांची संमती मिळाल्यानंतर महाराष्ट्र शासन राजपत्रात, दिनांक ११ मे १९८२ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला ].

## सन १९८२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९

**महाराष्ट्रातील दूरचित्रवाणी संचधारकांवर चैन-नि-करमणूक व मनोरंजन कर बसविणे व तो वसूल करणे यासाठी अधिनियम.**

ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्यातील दूरचित्रवाणी संचधारकांवर चैन-नि-करमणूक व मनोरंजन कर बसविणे आणि त्यांच्याकडून तो वसूल करणे आणि त्याशी संबंधित इतर बाबींची तरतूद करणे इष्ट आहे; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या तेहेतिसाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र दूरचित्रवाणी संचधारकांवरील चैन-नि-करमणूक व मनोरंजन कर अधिनियम, १९८२ असे म्हणता येईल. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

(२) तो संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असेल.

(३) तो, राज्य शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नेमील अशा तारखेस अमलात येईल.

व्याख्या. २. संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, या अधिनियमात,—

(अ) "जिल्हाधिकारी" म्हणजे महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ अन्वये नियुक्त करण्यात आलेला, जिल्ह्याचा जिल्हाधिकारी आणि त्यात, या अधिनियमाखालील जिल्हाधिकाऱ्याच्या अधिकारांचा वापर करण्यासाठी व जिल्हाधिकाऱ्याची कर्तव्ये पार पाडण्यासाठी राज्य शासनाने किंवा जिल्हाधिकाऱ्याने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही इतर महसूल अधिकाऱ्याचा समावेश होतो; १९६६ चा महा. ४१.

(ब) "आयुक्त" म्हणजे, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ अन्वये नियुक्त केलेला विभागीय आयुक्त, आणि त्यात उक्त अधिनियमान्वये नियुक्त केलेला अपर आयुक्त किंवा सहायक आयुक्त यांचा समावेश होतो; १९६६ चा महा. ४१.

(क) "दूरचित्रवाणी संचधारक" म्हणजे, बिनतारी संदेश व्यवस्था अधिनियम, १९३३ अन्वये कोणत्याही दूरचित्रवाणी संचाकरिता जिच्या नावे लायसन्स देण्यात आले असेल अशी व्यक्ती, आणि त्यात, जी व्यक्ती त्या वेळेपुरती एखादा दूरचित्रवाणी संच बाळगीत असेल—मग तो संच कोणत्याही आकाराचा असो किंवा तो कृष्णधवल संच असो वा रंगीत संच असो—तसेच त्या व्यक्तीने असे लायसन्स धारण केलेले असो वा नसो—अशा व्यक्तीचा समावेश होतो ; १९३३ चा १७.

(ड) "नगरपालिका क्षेत्र" म्हणजे, त्यावेळी अमलात असलेल्या संबंधित नगरपालिका कायद्यान्वये स्थापना करण्यात आलेल्या महानगरपालिकेच्या किंवा नगरपालिकेच्या हद्दीतील क्षेत्र;

(ई) "नगरपालिकेतर क्षेत्र" म्हणजे, राज्यातील नगरपालिका क्षेत्र नसलेले अन्य कोणतेही क्षेत्र, आणि त्यात, कटक अधिनियम, १९२४ अन्वये कटक क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आलेल्या कोणत्याही क्षेत्राचा समावेश होतो; १९२४ चा २.

(फ) "विहित" म्हणजे या अधिनियमाखाली केलेल्या नियमांद्वारे विहित;

(ग) नगरपालिका क्षेत्राच्यासंबंधात "वसुली अधिकारी" म्हणजे, राज्य शासन त्या क्षेत्राच्या संबंधात सर्वसाधारण वा विशेष आदेशाद्वारे अधिसूचित करील त्यानुसार, संबंधित महानगरपालिकेने किंवा नगरपालिकेने त्या संदर्भात प्राधिकृत केलेला एक वा अनेक नगरपालिका अधिकारी किंवा जिल्हाधिकारी आणि या संदर्भात राज्य शासनाने किंवा जिल्हाधिकाऱ्याने प्राधिकृत केलेला एक किंवा अनेक अधिकारी आणि नगरपालिकेतर क्षेत्राच्या संबंधात, जिल्हाधिकारी आणि राज्य शासनाने किंवा जिल्हाधिकाऱ्याने या संदर्भात प्राधिकृत केलेला एक किंवा अनेक अधिकारी; आणि एकाच क्षेत्रासाठी किंवा त्याच्या भागासाठी वेगवेगळे अधिकारी प्राधिकृत करता येतील अथवा एकच अधिकारी वेगवेगळ्या क्षेत्रांसाठी किंवा त्याच्या भागासाठी प्राधिकृत करता येईल;

(ह) "कर" म्हणजे, या अधिनियमान्वये बसविण्यात व वसूल करण्यात येणारा, चैनी—करमणूक व मनोरंजन कर;

(आय) "वर्ष" म्हणजे, १ जानेवारीपासून सुरू होणारे वर्ष, आणि "अर्धवर्ष" म्हणजे, १ जानेवारी रोजी सुरू होणारा व ३० जून रोजी संपणारा सहा महिन्यांचा कालावधी किंवा, यथास्थिति, १ जुलै रोजी सुरू होणारा व ३१ डिसेंबर रोजी संपणारा सहा महिन्यांचा कालावधी, आणि त्याच अर्धवर्षातील सहा महिन्यांहून कमी असणारा कोणताही कालावधी हा, कर भरण्याच्या दायित्वासाठी अर्धे वर्ष म्हणून मानण्यात येईल.

कर बसविणे व त्याची वसुली. ३. या अधिनियमाच्या इतर उपबंधांस अधीन राहून, प्रत्येक दूरचित्रवाणी संचधारकावर, त्याने धारण केलेल्या किंवा बाळगलेल्या प्रत्येक दूरचित्रवाणी संचामागे दर वर्षी रु. ६० या दराने राज्य शासनाकडून कर बसविण्यात येईल व तो वसूल करण्यात येईल.

वसुली अधिकाऱ्या-मार्फत कर भरणे. ४. (१) प्रत्येक दूरचित्रवाणी संचधारक, कोणत्याही वर्षासाठी त्याच्याकडून देय असलेल्या, कराची रक्कम, त्या वर्षाच्या ३१ जानेवारी रोजी किंवा तत्पूर्वी वसुली अधिकाऱ्याकडे भरील. जर एखाद्या धारकाने उपरोक्त तारखेला किंवा तत्पूर्वी रक्कम भरण्यात कसूर केली तर, तो, कराची व शास्तीची संपूर्ण रक्कम भरून होईपर्यंत, प्रत्येक संचामागे दर महिन्यास किंवा त्याच्या काही भागाकरिता ६ रुपये या दराने शास्ती भरण्यास पात्र ठरेल.

(२) जेव्हा एखादा धारक सहा महिन्यांच्या कालावधीकरिता कराची रक्कम भरण्यास पात्र होईल तेव्हा, तो ज्या महिन्यात अशी कराची रक्कम भरण्यास पात्र होईल त्या महिन्याच्या नंतरच्या महिन्यातील शेवटच्या दिवशी किंवा तत्पूर्वी, तो, अर्धवर्षास रु. ३० या दराने देय असलेली कराची रक्कम भरील; आणि त्याने जर उपरोक्त तारखेस किंवा तत्पूर्वी त्याच्याकडून देय असलेली कराची रक्कम भरण्यात कसूर केली तर तो कराची व शास्तीची संपूर्ण रक्कम भरून होईपर्यंत प्रत्येक संचामागे दर महिन्यास किंवा त्याच्या काही भागासाठी रु. ३ या दराने शास्ती भरण्यास पात्र ठरेल.

५. (१) केंद्र शासन किंवा राज्य शासन किंवा कोणतीही महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद, ग्रामपंचायत किंवा कटक क्षेत्र मंडळ यांच्या मालकीच्या किंवा त्यांच्या वतीने घेतलेल्या आणि ते वापरीत असलेल्या किंवा त्यांच्या वतीने वापरण्यात येत असलेल्या, कोणत्याही दूरचित्रवाणी संचाच्या संबंधात कोणताही कर आकारण्यात येणार नाही. सूट व परतावे.

(२) कोणत्याही क्लोज्ड-सर्किट दूरचित्रवाणी संचाच्या संबंधात कोणताही कर आकारण्यात येणार नाही.

(३) ज्या शैक्षणिक संस्थेला, राज्य शासनाने किंवा या संबंधात राज्य शासनाने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याने, मान्यता दिलेली असेल आणि विहित नमुन्यात वसुली अधिकाऱ्याकडे अर्ज केल्यानंतर व त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर तो विहित करील अशा शर्तींस व अटींस अधीन ठेवून जिला कर देण्यापासून त्याने सूट दिली असेल, त्या शैक्षणिक संस्थेच्या मालकीच्या आणि ती वापरीत असलेल्या कोणत्याही दूरचित्रवाणी संचाच्या संबंधात कोणताही कर आकारण्यात येणार नाही.

(४) व्यापाराच्या प्रयोजनार्थ दूरचित्रवाणी संचाच्या विक्रेत्याने किंवा अशा संचाच्या निर्मात्याने ठेवलेल्या दूरचित्रवाणी संचाच्या बाबतीत वसुली अधिकाऱ्याकडे विहित नमुन्यात अर्ज केल्यानंतर, आणि त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, वसुली अधिकाऱ्यास, विक्रेता किंवा यथास्थिति निर्माता हा प्रमाणपत्र अमलात असेल त्या कालावधीत, केवळ तीन दूरचित्रवाणी संचांच्या संबंधात कर भरण्यास पात्र असेल असे प्रमाणपत्र देता येईल. वसुली अधिकाऱ्याने दिलेले कोणतेही प्रमाणपत्र विहित करण्यात येतील अशा अटींस व शर्तींस अधीन असेल.

(५) एखाद्या दूरचित्रवाणी संचाच्या संबंधात ज्याने कर भरला आहे असा दूरचित्रवाणी संचधारक, ज्या वर्षाकरिता त्याने कर दिलेला आहे त्या संपूर्ण वर्षात किंवा त्याच्या सहा महिन्यांत तो त्या संचाचा वापर करणार नाही किंवा त्याने तसा वापर केलेला नाही, असा दावा करील तर त्यास, संबंधित कालावधीसाठी कर देण्यापासून सूट मिळण्याबाबतच्या प्रमाणपत्राकरिता, विहित नमुन्यात वसुली अधिकाऱ्याकडे अर्ज करता येईल. वसुली अधिकाऱ्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, अर्जदाराने आपला दावा सिद्ध केला आहे याबद्दल त्याची खात्री होईल तर त्यास विहित करण्यात येतील अशा अटींस व शर्तींस अधीन ठेवून अर्जदारास आवश्यक ते प्रमाणपत्र देता येईल.

(६) ज्याने कर भरलेला आहे आणि वसुली अधिकाऱ्याकडे विहित नमुन्यात अर्ज करून ज्याने, या कलमाच्या उपबंधांपैकी कोणत्याही उपबंधान्वये कर भरण्यापासून आपणास सूट मिळालेली आहे याबद्दल वसुली अधिकाऱ्याची खात्री पटवून दिली असेल अशा दूरचित्रवाणी संचधारकास, जी, त्याच्याकडून देय नसल्याचे आढळून आली असेल अशी त्याने भरलेली कराची आणि शास्तीची (कोणतीही असल्यास) रक्कम, परत मिळण्याचा हक्क असेल.

६. वसुली अधिकाऱ्यास किंवा यथास्थिति राज्य शासनाने किंवा जिल्हाधिकाऱ्याने, महानगर-पालिकेने किंवा नगरपालिकेने या बाबतीत विशेषकरून अधिकार प्रदान केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास, कर भरण्यास पात्र असलेल्या धारकाचा दूरचित्रवाणी संच ज्या जागेत ठेवण्यात आला आहे किंवा लपविण्यात आला आहे असे त्यास सकारण वाटेल अशा कोणत्याही इमारतीची, ठिकाणाची किंवा जागेची झडती घेता येईल आणि कर भरण्यासंबंधीचे दायित्व ठरविण्यासाठी आवश्यक ते सर्व प्रश्न कोणत्याही व्यक्तींना विचारता येतील. झडती घेण्याचे अधिकार.

**कराच्या थकबाकीची आणि शास्तीची वसुली.** ७. कराची सर्व थकबाकी आणि शास्तीची रक्कम ही, एक महिन्याची नोटीस दिल्यानंतर, जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे, जिल्हाधिकाऱ्यामार्फत वसूल करता येईल.

**कराच्या व शास्तीच्या रकमेविरुद्ध अपील.** ८. कोणत्याही दूरचित्रवाणी संचधारकाकडून देय असलेली कराची रक्कम किंवा त्याने द्यावयाची शास्तीची रक्कम ज्या आदेशाने निश्चित करण्यात आली असेल अशा, वसुली अधिकाऱ्याने दिलेल्या कोणत्याही आदेशामुळे किंवा त्याने दिलेल्या कोणत्याही अन्य आदेशामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही दूरचित्रवाणी संचधारकास, अशा आदेशाची सूचना त्यास मिळाल्यापासून तीस दिवसांच्या आत आयुक्ताकडे अपील करता येईल, आणि अपीलकारास त्याची बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, आयुक्ताने दिलेला निर्णय अंतिम असेल.

**अबाधता.** ९. या अधिनियमान्वये, सद्भावनापूर्वक केलेल्या किंवा करण्याचा हेतू असलेल्या कोणत्याही गोष्टीसाठी राज्य शासनाच्या, महानगरपालिकेच्या किंवा नगरपालिकेच्या कोणत्याही अधिकाऱ्याविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा इतर न्यायालयीन कार्यवाही दाखल करता येणार नाही.

**नियम करण्याचे अधिकार.** १०. (१) शासकीय राजपत्रात अधिसूचना प्रसिद्ध करून, राज्य शासनास या अधिनियमाखालील नियम करण्याच्या अधिकाराचा वापर करता येईल.

(२) या अधिनियमात अन्यत्र समाविष्ट असलेल्या, नियम करण्याच्या कोणत्याही अधिकारास बाध न येऊ देता, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्याकरता राज्य शासनास, नियम करता येतील.

(३) या अधिनियमाखालील सर्व नियम, पूर्वप्रसिद्धीच्या शर्तीस अधीन असतील.

(४) ह्या अधिनियमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य असेल तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनांत एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी जर त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे कबूल होतील किंवा नियम करू नये म्हणून दोन्ही सभागृहे कबूल होतील व असा निर्णय शासकीय राजपत्रात अधिसूचित करतील तर, अशा अधिसूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून यथास्थिती फेरबदल केलेल्या स्वरूपातच नियम अमलात येईल किंवा यथास्थिती अमलात येणार नाही. तथापि, असे कोणतेही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

**अडचणी दूर करण्याचे अधिकार.** ११. या अधिनियमाचे कोणतेही उपबंध अमलात आणताना कोणतीही अडचण उद्भवल्यास, राज्य शासनास, प्रसंगोपात, आदेशाद्वारे, अडचण दूर करण्यासाठी त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटेल अशी कोणतीही गोष्ट करता येईल :

परंतु, या अधिनियमास प्रारंभ झाल्याच्या तारखेपासून दोन वर्षांचा कालावधी संपल्यानंतर, असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(यथार्थ अनुवाद)

न. ब. पाटील,

भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.